# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२३/प्र.क्र.०६/एमबीए/एमएमएस/सुधारीत महत्वाची सूचना/२०२३/८०३ दिनांक :- १३/०४/२०२३

**महत्वाची सूचना**

**महा-एमबीए/एमएमएस सीईटी २०२३ दिनांक २५ व २६ मार्च २०२३**

**सदर परीक्षेच्या वेळेत उद्भवलेल्या तांत्रिक समस्यांमुळे पुढील उमेदवारांची फेर परीक्षा रविवार, दिनांक ३०/०४/२०२३ रोजी सकाळी ९ ते ११.३० या वेळेत घेण्यात येईल. अशा सर्व पुढील उमेदवारांचा सीईटी निकाल फेर परीक्षेच्या आधारावर घोषित केला जाईल.**

१. जे उमेदवार परीक्षेच्या अनिवार्य १५० मिनीटांच्या वेळेत तांत्रिक समस्या/अडचणींमुळे परीक्षा पुर्ण करु शकले नाहीत आणि ज्यांना पुन्हा परीक्षा द्यावयाची आहे अशा उमेदवारांनी सीईटी सेल कडे त्यांनी सादर केलेल्या ईमेल/पत्राद्वांरे केलेल्या विनंतीची सीईटी सेलद्वारे खात्री करुन अशा उमेदवारांना त्यांच्या लॉगिनमध्ये फेर परीक्षेसाठी सहमती पत्र उपलब्ध करून देण्यात येत आहे.

आणि

२. ज्या उमेदवारांना अनिवार्य १५० मिनिटांऐवजी १८० मिनिटांचा परीक्षेचा वेळ मिळाला आहे अशा उमेदवारांची पूर्वीची परीक्षा रद्द करण्यात आली असून सदर उमेदवारांची यादी स्वतंत्रपणे सीईटी सेलच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर उमेदवारांना पुन्हा परीक्षा देणे अनिवार्य राहील.

पुनर्परीक्षेसाठी लॉगिन सुविधा https://cetcell.mahacet.org येथे दिनांक ०६/०४/२०२३ पासून ते दिनांक १६/०४/२०२३ पर्यंत उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

वर नमूद केलेल्या उमेदवारांना त्यांच्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर, ई-मेल आणि एसएमएसद्वारे देखील सूचित करण्यात येत आहे. पात्र उमेदवारांना त्यांचे प्रवेशपत्राची प्रत त्यांच्या लॉगिनमध्ये यथावकाश उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्रात नमूद केलेल्या वेळेनुसार व वेळापत्रकानुसार केंद्रावर परीक्षेला बसणे ही उमेदवारांची जबाबदारी असेल.

ईमेल आयडी :- १. cetcell@mahacet.org
२. mhtcet23.cetcell@gmail.com
हेल्पलाईन क्रमांक :- 91-9175108612, 91-18002103111

**सही/-**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**